# जिल्हा व सत्र न्यायालय
# नांदेड – ४३१ ६०१

E-mail : mahnandc@mhstate.nic.in
Telephone No. : 02462 - 234555, 244683. Fax No. : 02462-244682

## निविदा सुचना

याद्वारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालयास **झेरॉक्स पेपर** ए–४ आकाराचे आपल्याकडील उपलब्ध उत्कृष्ट दर्जाचे ५०० (पाचशे) रिम खरेदी करावयाचे प्रस्तावित आहे.

त्याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून **झेरॉक्स पेपरच्या सर्व करांसहित प्रतिरिम दराचा** समावेश आणि **झेरॉक्स पेपरचे सॅम्पल कागद** असलेली सीलबंद निविदा या कार्यालयास **दिनांक : १० जानेवारी २०२३** रोजीपर्यंत किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत पोहचतील या बेताने पाठविण्यात यावेत. निविदेमध्ये मागणी केलेला कागद त्वरित व उधारीवर पुरवठा करण्याची तयारी पुरवठादाराची असावी, कोषागारातुन देयक पारित झाल्यावर पुरवठादारास देयकाची रक्कम प्रदान करण्यात येईल.

सीलबंद लिफाफा **"मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड"** यांचे नावे **"झेरॉक्स पेपर पुरवठा निविदा"** असे ठळक अक्षरात लिहुन द्यावे.

### निविदा खालील अटींवर मंजूर करण्यात येईल.

- मागणी केलेल्या झेरॉक्स पेपरचा पुरवठा जिल्हा न्यायालयात करण्याची व्यवस्था पुरवठादाराकडे राहिल. त्यासाठी वाहतूक, हमाली किंवा इतर कोणतेही खर्च/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.
- पुरवठा करण्यात आलेला कागद मागणीनुसार असल्याची खातरजमा झाल्यानंतरच आपले उधारी देयक उपलब्ध अनुदानानुसार तसेच, कोषागारातुन देयक पारित झाल्यानंतर पुरवठादारास कार्यालयीन कामकाजानुसार ऑनलाईन रक्कम/धनादेश अदा करण्यात येईल.
- प्राप्त निविदा मंजूर अथवा रद्द करण्याचे संपुर्णत: अधिकार या न्यायालयास राहतील.
- निवीदा दाखल करणाऱ्या पुरवठादाराकडे GST/सेल्स टॅक्स नंबर असणे आवश्यक आहे.
- देयक अदा केल्यानंतर देयकाची पावती सादर करावी लागेल.
- सदरहू निवीदेमध्ये कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय बदल, दुरूस्ती किंवा सुधारणा करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.
- सदरहू करण्यात आलेला दरकरार/निवीदा कोणत्याही क्षणी कोणत्याही कारणाशिवाय मंजूर अथवा रद्द करण्याचा संपूर्णत: अधिकार हा या कार्यालयाचा राहील.

मागे पहा..

- निविदेबाबतच्या विवादासाठी न्यायिक क्षेत्र नांदेड असेल.
- तसेच निविदाधारकाची निविदा मंजूरीनंतरही प्रत्यक्ष खरेदी करतेवेळी शासनाच्या GeM Portal वरील दर पाहून GeM वरील दर कमी असल्यास GeM Portal वरुन खरेदी करण्याचे स्वातंत्र्य या कार्यालयास राहिल.

आदेशावरुन,

प्रबंधक, 04.01.2024
जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांक : ०४ जानेवारी २०२३ }

जावक क्रमांक/वित्त विभाग/लेसा/ 124 /२०२३

प्रति,
अधिक्षक, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांना सदरहू निवीदा नोटीस अग्रेषीत करण्यात येवून कळविण्यात येते की, त्याची एक प्रत बेलीफामार्फत खालील ठिकाणी देवून/चिकटविण्यात येवुन मुळ गोषवारा लवकर या न्यायालयास परत करण्यात यावा.

०१) विजय स्टेशनरी सप्लायर्स, दूकान नं. ३३, जकात नाका कॉम्प्लेक्स, नांदेड.
०२) कविता स्टेशनरी सप्लायर्स, ९९—सी, को. ऑप., इंडस्ट्रीयल इस्टेट, ज्योती टॉकीज रोड, शिवाजी नगर, नांदेड.
०३) श्रीनाथ जनरल स्टोअर्स, शिवाजी नगर, मेन रोड, नांदेड
०४) तेज पेपर प्रोडक्ट, तारासिंग मार्केट, एस.बि.आय. बॅंके समोर मो. ९०२१९४३७९६
०६) जिल्हा न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०७) दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०८) मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
०९) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
१०) जिल्हा परिषद, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
११) नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड यांचे नोटीस बोर्ड
१२) जिल्हा न्यायालयच्या संकेतस्थळावर

आदेशावरुन,

प्रबंधक, 04.01.2024
जिल्हा न्यायालय, नांदेड

जिल्हा न्यायालय, नांदेड }
दिनांक : ०४ जानेवारी २०२३ }